# MPSC

## राज्यसेवा परीक्षा

द युनिक अ‍ॅकॅडमी

नवीन उपक्रम

# पदवीकाळातच करा! राज्यसेवा परीक्षेची तयारी



# 2 Years Integrated Batch

www.theuniqueacademy.com

Unique Institute of Higher Learning Pvt. Ltd.

The Unique academy




# महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC)

महाराष्ट्र लोकसेवा आयोग (**MPSC**) हा भारतीय राज्यघटनेतील कलम 315 नुसार स्थापन करण्यात आलेला स्वायत्त व घटनात्मक आयोग असून, आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतील राजपत्रित तसेच अराजपत्रित अधिकारी पदांच्या भरतीसाठी विविध परीक्षांचे आयोजन केले जाते. राज्यसेवा परीक्षा ही त्यातील एक महत्त्वाची परीक्षा होय. या राज्यसेवा परीक्षेच्या माध्यमातून वर्ग–1 व वर्ग–2 प्रवर्गातील राजपत्रित अधिकाऱ्यांची निवड केली जाते, ज्यामध्ये प्रामुख्याने उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधीक्षक वा सहायक पोलीस आयुक्त, सहायक राज्य कर आयुक्त, उपनिबंधक सहकारी संस्था, जि. प. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार, नगरपरिषद मुख्याधिकारी इ. महत्त्वपूर्ण पदांचा समावेश होतो.

राज्यसेवा परीक्षेद्वारे भरली जाणारी ही सेवापदे समाजाच्या नागरी जबाबदाऱ्या सांभाळण्याचे कार्य करतात. त्यामुळे त्यांस सनदी सेवा (**Civil Services**) म्हणून ओळखले जाते. या नागरी जबाबदाऱ्यात मुख्यतः महसूल, कायदा–सुव्यवस्था, अर्धन्यायिक बाबी आणि विकासात्मक कामे या प्रमुख जबाबदाऱ्यांचा समावेश होतो. तसेच ते राज्याच्या पातळीवर कायदे आणि सार्वजनिक धोरणांच्या अंमलबजावणीचे कार्य करतात. या सेवांची महत्त्वपूर्ण भूमिका लक्षात घेऊनच संविधानाने या सेवापदांस महत्त्वपूर्ण अधिकार बहाल केलेले आहेत. म्हणूनच सार्वजनिक हित साधून समाजावर दूरगामी प्रभाव पाडण्याची मोठी क्षमता बाळगणाऱ्या या सेवा अनेक तरुण–तरुणींसाठी करिअरचा एक रचनात्मक मार्ग ठरलेल्या आहेत.

# भूमिका

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या सनदी सेवा (राज्यसेवा) परीक्षांच्या माध्यमातून राज्याच्या प्रशासनाचा भाग होण्याच्या उद्देशाने अनेक महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी या स्पर्धा परीक्षांची तयारी करत असतात. या परीक्षांच्या तयारीसंबंधी वाढलेल्या जागृतीमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या पदवीच्या सुरुवातीपासूनच या परीक्षांची माहिती उपलब्ध होत आहे. त्यामुळे पदवीकाळातच या परीक्षांची तयारी सुरु करण्याकडे मोठ्या प्रमाणात कल वाढत आहे.

राज्य लोकसेवा आयोगाने अलीकडेच (जुलै 2022 मध्ये) राज्यसेवा परीक्षेत संघ लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर परीक्षापद्धती, रचना व अभ्यासक्रम स्वीकारल्यामुळे एकंदर तयारीचा व्याप वाढला आहे. सामान्य अध्ययनाचे 4 पेपर्स, एक वैकल्पिक विषय आणि निबंधाचा स्वतंत्र पेपर यामुळे परीक्षेची व्याप्ती वाढली आहे, यात शंका नाही. त्यामुळे या नव्या परीक्षेस सामोरे जाण्यासाठी आता दीर्घकालीन नियोजनाची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांची ही गरज लक्षात घेऊन 'द युनिक ॲकॅडमी'ने राज्यसेवा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षे कालावधीच्या समग्र अभ्यासवर्गाचा (**2 Years Integrated Batch**) उपक्रम सुरू केला आहे.

राज्यसेवा परीक्षेची रचना, स्वरूप आणि अभ्यासक्रम यात झालेल्या बदलांमुळे पदवीकाळातच या परीक्षेचा नियोजनबद्ध अभ्यास हाती घेता यावा आणि परीक्षेच्या प्रत्येक टप्प्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, या हेतूने या कोर्सची रचना केली आहे. अशारितीने, पदवी-शिक्षण घेतानाच इच्छुक विद्यार्थ्यांना राज्यसेवा परीक्षेचा अभ्यास करता येईल, यात शंका नाही.

**तुकाराम जाधव**
(संचालक, द युनिक ॲकॅडमी)

**मल्हार पाटील**
(संचालक, द युनिक ॲकॅडमी)

# पदवीकाळातच करा राज्यसेवा परीक्षेची तयारी

## बॅचची वैशिष्ट्ये

- दोन वर्षांच्या नियोजनबद्ध बॅचद्वारे राज्यसेवा परीक्षेच्या पूर्व, मुख्य व व्यक्तिमत्व चाचणी (मुलाखत) या तिन्ही टप्प्यांचे सर्वांगीण मार्गदर्शन.
- पहिल्या वर्षी सामान्य अध्ययनातील इतिहास, भूगोल, राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था, विज्ञान-तंत्रज्ञान, नैतिकता या मध्यवर्ती विषयांचे पायाभूत अभ्यासवर्ग, ज्याद्वारे या विषयांचा संकल्पनात्मक पाया मजबूत केला जाईल.
- नागरी सेवा कलचाचणीची तोंडओळख. (विशेषतः आकलन व मूलभूत अंकगणिताची पायाभरणी)
- चालू घडामोडींची विशेष तयारी, ज्यात नियमित अभ्यासवर्ग आणि संदर्भ-साहित्याचा समावेश असेल.
- व्यक्तिमत्त्व चाचणी अर्थात मुलाखतीसाठी अभ्यासेतर घटकांच्या (छंद, राष्ट्रीय सेवा योजनेसारखे उपक्रम, क्रीडा व इतर स्पर्धांमधील सहभाग, इ.) तयारीसाठी विशेष मार्गदर्शन
- वाचन, विचार आणि लेखनकौशल्याच्या विकासासाठी विशेष उपक्रम (माझा जिल्हा, दोन शोध निबंध, पुस्तक परीक्षण, प्रकल्प स्थळांना भेट व अहवाल लेखन, तज्ज्ञांच्या मुलाखतीचे आयोजन अशा उपक्रमांचा समावेश)
- अद्ययावत संदर्भ-साहित्य (रंगीत डिजिटाइज्ड् स्वरूपातही नोट्स)
- मराठी, इंग्रजी व गणित या विषयांचा फायदा इतर सर्व परीक्षांसाठी व्हावा हा उद्देश
- व्यक्तिमत्व चाचणीच्या तयारीसाठी पायाभूत मार्गदर्शन. अभिरूप मुलाखतीचे (मॉक इंटरव्ह्यू) आयोजन. यशस्वी विद्यार्थ्यांच्या मुलाखतीचे चित्रण व त्यावर चर्चा.
- तज्ज्ञ अभ्यासकांची काही मार्गदर्शनपर सत्रे
- विद्यार्थ्यांचे सामाजिक भान वाढवण्यासाठी तसेच त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी अभ्यासक व अधिकारी यांच्याशी संवाद-सत्रे, शासकीय कार्यालये, प्रकल्पक्षेत्रांस भेटी. महत्त्वाच्या विषयांवरील डॉक्युमेंटरीज्, चित्रपट व लघुचित्रपटांचे प्रदर्शन व त्यावर चर्चा
- सराव चाचण्यांद्वारे सविस्तर मूल्यांकन. पहिल्या वर्षापासूनच बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न आणि दीर्घोत्तरी प्रश्नांवर आधारित सराव चाचण्या आणि त्याचे चिकित्सक मूल्यांकन
- विद्यार्थ्यांचे व्यक्तीगत समुपदेशन व त्यांना मार्गदर्शन

# MPSC STATE SERVICE

# राज्यसेवा
## परीक्षेचे स्वरुप

**परीक्षा योजना** ही परीक्षा खालील प्रकारे **3** टप्प्यांमध्ये घेतली जाते.

(1) महाराष्ट्र नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा **400** गुण (2) राज्यसेवा स्वतंत्र मुख्य परीक्षा **1750** गुण (3) मुलाखत **275** गुण

### पहिला टप्पा : महाराष्ट्र नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – 400 गुण

| पेपर क्रमांक | पेपर | प्रश्नांची संख्या/गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपुस्तिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| पेपर-1 | सामान्य अध्ययन (**GS**) | **100 / 200** | पदवी | मराठी व इंग्रजी | प्रत्येकी दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| पेपर-2 | नागरी सेवा कल चाचणी (CSAT) | **80 / 200** | उच्च माध्यमिक व पदवी | | | |

**टीप :** सामान्य अध्ययन पेपर क्रमांक **2 (CSAT)** हा अर्हताकारी **(Qualifying)** असून अर्हताप्राप्त करण्यासाठी किमान **33%** गुण मिळविणे आवश्यक राहील. या पेपरमध्ये किमान **33%** गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारांची पेपर क्र. **1** मधील गुणांच्या आधारे राज्यसेवा मुख्य परीक्षेसाठी गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. कृषी, वन व अभियांत्रिकी सेवा या मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम आयोग स्वतंत्ररीत्या जाहीर करेल.

### दुसरा टप्पा : राज्यसेवा स्वतंत्र मुख्य परीक्षा – 1750 गुण

1. परीक्षेचे स्वरुप – वर्णनात्मक
2. एकूण पेपर – नऊ
3. अर्हताकारी पेपर – भाषा पेपर 1 – मराठी – **300** गुण (**25%** गुणांसह अर्हताकारी)
   भाषा पेपर 2 – इंग्रजी – **300** गुण (**25%** गुणांसह अर्हताकारी)

**गुणवत्ता यादीकरिता विचारात घ्यावयाचे पेपर्स व त्यांचे गुण**

1. निबंध (मराठी किंवा इंग्रजी माध्यम) — **250** गुण
2. सामान्य अध्ययन 1 — **250** गुण
3. सामान्य अध्ययन 2 — **250** गुण
4. सामान्य अध्ययन 3 — **250** गुण
5. सामान्य अध्ययन 4 — **250** गुण
6. वैकल्पिक विषय पेपर क्रमांक 1 — **250** गुण
7. वैकल्पिक विषय पेपर क्रमांक 2 — **250** गुण

### तिसरा टप्पा : व्यक्तीमत्व चाचणी अर्थात मुलाखत : 275 गुण

अंतिम निवडीसाठी एकूण गुण : राज्यसेवा स्वतंत्र मुख्य परीक्षा 1750 गुण + मुलाखत 275 गुण = एकूण गुण 2025

**वैकल्पिक विषयाकरिता खालील विषयांमधून एका विषयाची निवड करणे आवश्यक आहे.**

| | | |
|---|---|---|
| 1. कृषी | 10. भूगोल | 19. भौतिक शास्त्र |
| 2. पशुसंवर्धन व पशुवैद्यकीय विज्ञान | 11. भूविज्ञान | 20. राज्यशास्त्र व आंतरराष्ट्रीय संबंध |
| 3. मानववंशशास्त्र | 12. इतिहास | 21. मानसशास्त्र |
| 4. वनस्पतीशास्त्र | 13. विधी | 22. लोकप्रशासन |
| 5. रसायनशास्त्र | 14. व्यवस्थापन | 23. समाजशास्त्र |
| 6. स्थापत्य अभियांत्रिकी | 15. गणित | 24. सांख्यिकीशास्त्र |
| 7. वाणिज्य व लेखा | 16. यांत्रिकी अभियांत्रिकी | 25. प्राणीशास्त्र |
| 8. अर्थशास्त्र | 17. वैद्यकीय विज्ञान | 26. मराठी वाङ्‌मय |
| 9. विद्युत अभियांत्रिकी | 18. तत्त्वज्ञान | |

**शतमत पद्धत (मुख्य परीक्षा) :** (1) अमागास – किमान 35 शतमत (2) मागासवर्गीय – किमान 30 शतमत (3) दिव्यांग – किमान 20 शतमत (4) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू – किमान 20 शतमत

**लेखी परीक्षेमधून मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त होण्याकरिता शतमत (Percentile) पद्धत लागू आहे. या परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या उमेदवाराच्या एकूण गुणांच्या तुलनेत वरील प्रमाणे किमान शतमत गुण प्राप्त करणारे उमेदवार मुलाखतीच्या पात्रतेकरिता आयोगाकडून विचारात घेतले जातील.**

| क्र. | राजपत्रित पदे गट (अ) | क्र. | राजपत्रित पदे गट (ब) |
|---|---|---|---|
| 1. | उपसंचालक/प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प) (श्रेणी एक)/उपायुक्त | 1. | उपशिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) |
| 2. | उपजिल्हाधिकारी | 2. | कक्ष अधिकारी, मंत्रालयीन विभाग |
| 3. | पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त | 3. | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी |
| 4. | सहायक राज्य कर आयुक्त | 4. | लेखा अधिकारी, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा |
| 5. | उपनिबंधक, सहकारी संस्था | 5. | अधीक्षक निरीक्षक प्रमाणित शाळा व संस्था, रचना व कार्यपद्धती अधिकारी महिला व बाल विकास आयुक्तालय आणि बालविकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) एकात्मिक बाल विकास सेवा योजना |
| 6. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी | 6. | सहायक गट विकास अधिकारी |
| 7. | सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा | 7. | मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपरिषद |
| 8. | मुख्याधिकारी, नगरपालिका/परिषद | 8. | सहायक निबंधक सहकारी संस्था |
| 9. | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क | 9. | उपअधीक्षक, भूमी अभिलेख |
| 10. | शिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) | 10. | उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क |
| 11. | प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प)(श्रेणी दोन)/सहायक आयुक्त | 11. | सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क |
| 12. | उद्योग उपसंचालक (तांत्रिक) | 12. | कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी |
| 13. | बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी)/सहायक आयुक्त परिविक्षा अधिक्षक/जि. महिला व बाल विकास अधिकारी (महिला व बालविकास) जि.प. | 13. | उद्योग अधिकारी, तांत्रिक |
| 14. | तहसीलदार | 14. | सरकारी कामगार अधिकारी |
| 15. | सहायक संचालक, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता | 15. | सहायक प्रकल्प अधिकारी/सांख्यिकी अधिकारी/प्रशासकीय अधिकारी/संशोधन अधिकारी/गृहप्रमुख/प्रबंधक |
| 16. | सहायक कामगार आयुक्त | 16. | नायब तहसीलदार |

## (अ) वयोमर्यादा

| किमान | कमाल | | प्रावीण्यप्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अमागास/ मागासवर्गीय/ आर्थिक दुर्बल घटक | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ/ आर्थिक दुर्बल घटक | अमागास | मागासवर्गीय/ आर्थिक दुर्बल घटक | अमागास | मागासवर्गीय/ आर्थिक दुर्बल घटक | वयाच्या 45 वर्षांपर्यंत |
| 19 | 38 | 43 | 43 | 43 | 43 | 43 | |

## (ब) शैक्षणिक अर्हता

खाली नमूद केलेली पदे वगळून इतर पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली विहित अर्हता आवश्यक आहे.

| पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|
| सहायक संचालक,<br>महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ | ◆ B.Com. (with 55%)<br>◆ ICAI (CA)<br>◆ ICWAI<br>◆ M.Com.<br>◆ M.B.A. in Finance |
| सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी गट-ब | ◆ B.Sc. in Physics and Math.<br>◆ The Bachelor of Engineering Degree (B.E.) |
| उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ<br>उद्योग अधिकारी (तांत्रिक), गट-ब | ◆ B.Sc.<br>◆ The Bachelor of Engineering Degree (B.E.) |

- मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक
- पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील.
  परंतु मुख्य परीक्षेकरिता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.
- अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवीधारकाने शैक्षणिक अर्हतेबाबतची अट मुख्य परीक्षेची माहिती/अर्ज स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यंत पूर्ण केली असली पाहिजे.

## (क) शारीरिक अर्हता

| पदाचे नाव | पुरुष | | महिला |
|---|---|---|---|
| | उंची | छाती | उंची |
| पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट-अ | 165 सें.मी. | 84 सें.मी. (+5 सें.मी.) | 157 सें.मी. |
| अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-अ<br>उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-अ | 165 सें.मी. | 79 सें.मी. (+5 सें.मी.) | 155 सें.मी. |
| सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब | 163 सें.मी. | 79 सें.मी. (+5 सें.मी.) | 163 सें.मी. |

चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी असावी आणि रंगांधळेपणा नसावा.

# MPSC
STATE SERVICE

## Batches Schedule 2025
मराठी माध्यम



बदललेल्या अभ्यासक्रम आणि परीक्षापद्धतीनुसार

ONLINE+OFFLINE

## 2 Years Integrated Batch

पूर्व+मुख्य+मुलाखत एकत्रित तयारी

| | | |
|---|---|---|
| **REGULAR Batches :** | 19 मे, 23 जून, 21 जुलै, 18 ऑगस्ट, 15 सप्टेंबर, 01 डिसेंबर | सायं. 5 ते 7 सोम ते शुक्र |

## MPSC राज्यसेवा
### वैकल्पिक विषय (Optional Subjects)
**बॅच सुरु : 9 जानेवारी 2025 व 31 जुलै 2025**

### मराठी माध्यम

| विषय | मार्गदर्शक |
|---|---|
| राज्यशास्त्र व आंतरराष्ट्रीय संबंध | तुकाराम जाधव । प्रविण चव्हाण |
| भूगोल | लोकेश थोरात । हर्षल लवंगारे |
| इतिहास | शरद पाटील । प्रविण चौगले |
| लोकप्रशासन | सुहास धर्मशाळे |
| समाजशास्त्र | शिवाजी काळे |

### English Medium

| Subject | Faculty |
|---|---|
| Political Science & IR | Tukaram Jadhav I Pravin Chavan |
| Geography | Nilesh Kondhalkar |
| History | Pankaj Vhatte |
| Public Administration | Bhushan Patil |
| Sociology | Shivaji Kale |
| Anthropology | |

**Online & Offline Test Series Available**

Visit us at : www.theuniqueacademy.co.in

**Our Branches**

Pune : 89299 20917, 8956994499

Delhi : 8010078886
Dadar : 7669815704
Thane 1 : 7669815703
Thane 2 : 7669815701
Kalyan : 8929728419

Chatrapati Sambhajinagar : 7669098308
Nashik : 8929728408
Jalgaon : 8929728418
Dhule : 8929728416

Nagpur : 8587995067

The UNIQUE academy

UNIQUE INSTITUTE OF HIGHER LEARNING PVT. LTD.

द युनिक अ‍ॅकॅडमी, गुरुकृपा कॉम्प्लेक्स, ४ था मजला, ज्ञानेश्वर पादुका चौक, शिवाजीनगर, पुणे.

For Online Admissions & Test Series : Visit us www.theuniqueacademy.co.in